# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोल्हापूर येथील श्री.क्षेत्र महालक्ष्मी मंदीर व परिसराच्या विकास आरखड्याबाबत

**(१) १०८१ (२३-१२-२०१४). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील श्री.क्षेत्र महालक्ष्मी मंदीर व परिसराच्या विकासाचा आराखडा नगरविकास विभागाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा प्रस्तावांस अद्यापही नगरविकास विभागाने मंजूरी दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या आराखड्यास मंजूरी देऊन प्रत्यक्षात कामास केव्हापासून सुरुवात करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०३-२०१७) :**(१), (२), (३) व (४) श्री.महालक्ष्मी मंदीर विकास प्रकल्प आराखडा व तीर्थक्षेत्र विकास प्राधिकरणाचा सुधारीत प्रस्ताव नियोजन विभागाच्या दिनांक ४/६/२०१५ शासन निर्णयातील तरतुदीनुसार आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या मार्फत विभागीय आयुक्त, पुणे यांना दि. २५/८/२०१६ रोजी सादर केलेला आहे.

सदर प्रस्तावाची विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडून छाननी करण्यात येत आहे.

प्रस्ताव प्राप्त झाल्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**कोल्हापूर शहरातील रंकाळा तलावात ऑक्सिजनचे प्रमाण खेळते रहावे म्हणून याकरीता खरेदी करण्यात आलेल्या दोन बोटी गायब झाल्याबाबत**

**(२) १०८९ (२३-१२-२०१४). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील रंकाळा तलावात ऑक्सिजनचे प्रमाण खेळते रहावे याकरीता दोन बोटी खरेदी करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बोटी गायब झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच या तलावाच्या दुसऱ्या टप्प्यातील विकास कामेही मंद गतीने सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७) :** (१) हे खरे आहे.

रंकाळा तालावातील जलशुध्दीकरण (एरीएशन) कामासाठी मदत करणे करीता या बोटी खरेदी करण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

विभागीय कार्यालयाच्या ताब्यात असलेल्या दोन बोटी पैकी एक बोट दुरुस्त करुन ती वापरण्यात येत आहे. दुसरी बोट माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दरम्यान नादुरुस्त होती व ती दुरुस्त करण्याची कार्यवाही सुरु होती सध्या दोन्हीही बोटी कोल्हापूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय क्र. १ च्या ताब्यात व वापरात आहेत.

(३) राष्ट्रीस सरोवर संवर्धन योजना टप्पा (२) मध्ये प्रस्तावित केलेली काही महत्वाचे कामे मा.हरित लवाद, पुणे येथील दाखल याचिके नंतर अमृत अभियाना अंतर्गत प्रस्तावित केली असून, नगर विकास विभागामार्फत शासन निर्णय क्र. अमृत-२०१७/प्र.क्र.२७/नवि-३३ दि.८/२/२०१७ अन्वये अमृत योजनेस प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ नगरपालिका हद्दीतील शिवाजी चौक ते स्वामी समर्थ चौक या रस्त्याच्या कामाबाबत**

**(३) ७२५५ (०७-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील शिवाजी चौक ते स्वामी समर्थ चौक या रस्त्याचे काम घेणाऱ्या शंभु कन्स्ट्रक्शन कंपनीच्या ठेकेदाराने सन २०११ मध्ये घेतलेले काम आजतागायत पूर्ण केले नसल्याने नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत सदर ठेकेदाराची हकालपट्टी करुन अनामत रक्कम जप्त करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सदर ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१७)** :(१) व (२) हे खरे आहे.

शंभू कंन्ट्रक्शन कंपनीने सदर रस्त्याच्या एकूण कामापैकी ५० टक्के काम पूर्ण केले आहे. निविदेतील अटी व शर्ती नुसार विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी उलटून गेल्यावरही कंत्राटदार काम करीत नसल्याने कंत्राट रद्द करण्यात आले आहे.

याबाबत कंत्राटदाराने भरलेली अनामत रक्कम जप्त करण्याचा निर्णय अंबरनाथ नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कन्हान (जि.नागपूर) भागात जलशुध्दीकरण केंद्राच्या उभारणीबाबत**

**(४) ९५३२ (०७-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्हान (जि.नागपूर) नदीचे पाणी दुषित झाल्याने आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागात जलशुध्दीकरण केंद्राची मागणी तेथील नागरिकांनी वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जलशुध्दीकरण केंद्राच्या उभारणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरूप काय आहे, तसेच सदरच्या केंद्राचे बांधकाम केव्हापर्यंत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७)** :(१), (२) व (३) नदीचे पाणी दुषित झाल्याचे निदर्शनास आले नसल्याचे मुख्याधिकारी यांनी त्यांच्या अहवालात नमुद केले आहे.

जलशुध्दीकरण केंद्राच्या उभारणीचा निर्णय नगरपरिषदेने घेतला असून त्या संदर्भातील प्रस्ताव तांत्रिक मंजूरीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तेल्हारा (जि.अकोला) येथे जेष्ठे नागरिकांनी विरंगुळा केंद्र उभारणीबाबत

**(५) १३५४८ (०७-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) येथे जेष्ठ नागरिकांनी विरंगुळा केंद्र उभारणी करिता मुख्य अधिकारी यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१५ व त्यापूर्वी तेल्हारा तालुका जेष्ठ नागरिक संघटना यांनी शासनाकडे दिनांक २ सप्टेंबर, २०१४ रोजी कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. २०१४/प्र.क्र.२१७/पंरा-७/बांधकाम अन्वये उद्देशून पत्र व्यवहार करुन जागेची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, जेष्ठ नागरिक संघटना तेल्हारा यांना विरंगुळा केंद्र उभारणीसाठी जागा देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) नगर परिषदेने गृहनिर्माण कॉलनी मधील खुली जागा विरंगुळा केंद्र बांधकामाकरीता निश्चित केली आहे. निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विकास योजना आराखड्यासंदर्भातील नोटीस व परिपत्रके मराठीतच प्रसिध्द करण्याबाबत

**(६) १५१६२ (०८-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२ रोजी (WRIT PETITION NO.७५१३ OF २०११) विकास योजना आराखड्यासंदर्भातील नोटीस व परिपत्रके मराठीत प्रसिध्द करणेकामी नियम संपूर्ण राज्यासाठी लागू करणेबाबत आदेशीत केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबतचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्यात आले आहेत काय,

(३) नसल्यास, सदर कार्यवाही कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे व याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय विचारात घेवून, त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याची शासनाची भुमिका आहे.

---

**केंद्र शासनाने किनाऱ्यावरील क्षेत्राच्या विकासासाठी ३ वर्षापूर्वी अधिसुचना जाहिर केल्याबाबत**

**(७) १५८८१ (०७-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने किनाऱ्यावरील क्षेत्राच्या विकासासाठी ३ वर्षापूर्वी (२०११ मध्ये) अधिसुचना जाहिर करुनही त्यावर शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याने मुंबईतील सीआरझेड बाधित क्षेत्राचा विकास पूर्णपणे रखडलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नव्या अधिसूचनेत तसेच मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीत मोठया प्रमाणात तफावत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध अटी मध्ये संदिग्धता असल्याने रहिवाशी न विकासकामध्ये असलेल्या संभ्रमामुळे सीआरझेड बाधित क्षेत्राचा एकही प्रकल्प आतापर्यंत मार्गी लागलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्राच्या अधिसूचनेनुसार शासनाने २ वर्षाच्या आत कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅथॉरिटी स्थापन करणे आवश्यक होते तसेच कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅनही शासनाने तयार करणे आवश्यक असताना या दोन्ही गोष्टींकडे शासनाने दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, केंद्र शासनाच्या अधिसुचनेनुसार कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅथॉरिटी स्थापन करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(६) केंद्र शासनाच्या सदरहू अधिसुचनेनुसार कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅथॉरिटी विनाविलंब स्थापन करुन योग्य तो आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१७) :**(१) ते (३) अशी बाब नाही.

केंद्र शासन पर्यावरण व वनमंत्रालयाने सीआरझेड क्षेत्रामधील विकासाच्या संदर्भात दिनांक ६.१.२०११ रोजी अधिसूचना जाहिर केलेली आहे. सदरच्या अधिसूचनेनुसार दिनांक १९.२.९१ रोजी अंमलात असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास नियंत्रित होतो तथापि सदरच्या अधिसूचनेमध्ये बृहन्मुंबई क्षेत्राचा विशेषत्वाने विचार झालेला आहे. त्यानुसार मुंबईमधील धोकादायक इमारती, उपकर इमारती यांचा पुनर्विकास विदयमान नियमांच्या तरतूदीप्रमाणे अनुज्ञेय आहे.

सीआरझेड क्षेत्रामधील विकासाचे प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅथॉरिटीकडे (MCZMA) दाखल केले जातात व कोस्टल झाने मॅनेजमेंट अॅथॉरिटीकडून त्यास मान्यता दिली जाते.

(४) ते (६) अशी बाब नाही.

कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅथॉरिटीची स्थापना दिनांक १.४.२००२ पासून नियमित ३ वर्षासाठी करण्यात येत असते. त्यानुसार यापूर्वी दिनांक ३१.१२.२००८, दिनांक ६.३.२०१२ व दिनांक १३.४.२०१५ रोजी (२०११ पासून) अॅथॉरिटीची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्यासाठीचा कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅन तयार करण्याचे काम केंद्रिय पर्यावरण, वन व वातारणीय बदल मंत्रालयाने प्राधिकृत केलेल्या आयआरएस, चेन्नई व एन.सी.एस.सी.एम. केरळ या संस्थामार्फत प्रगतीपथावर आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयातील शिरोली नगरपालिकेला मंजूरी मिळणेबाबत**

**(८) ३६९४४ (२१-०१-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हुपरी नगरपालिकेला (जि. कोल्हापूर) मा. मुख्यमंत्री यांनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरोलीस नगरपालिकेचा दर्जा मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिरोलीस नगरपालिकेचा दर्जा मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासन केव्हापर्यंत निर्णय घेणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७) :**(१) व (२) जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या अहवालानुसार हे खरे नाही.

(३) व (४) कोल्हापूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थापन करण्याची बाब विचाराधीन असून त्यामध्ये शिरोली समाविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरज (जि.सांगली) येथील हजरत ख्वाजा शमनामिरा (र.ह.) दर्ग्याचा विकास करणेबाबत**

**(९) ४१५७५ (१३-०५-२०१६). श्री.धनंजय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) येथील हजरत ख्वाजा शमनामिरा (र.ह.) दर्ग्यास शासनाने सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पामध्ये विकासाकरीता १०० कोटी रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यादरम्यान दर्ग्यास तीर्थक्षेत्राचाही दर्जा देण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, तीर्थक्षेत्र विकास योजनेतंर्गत किती निधीची तरतुद करण्यात आली आहे,

(४) असल्यास, महानगरपालिकेने या दर्ग्याचा विकास आराखडा मंजूरीकरीता शासनास सादर करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७) :**(१), (२), (३), (४) व (५) हजरत ख्वाजा शमनाशिरा दर्ग्यास तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास दि. ६/८/२०१३ रोजी सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडून सादर करण्यात आला होता. याबाबत जिल्हाधिकारी सांगली यांना नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का-१४४४ दि. ४ जून, २०१५ मधील मार्गदर्शक सुचनेनुसार फेरप्रस्ताव सादर करण्याबाबत दि. ७/३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिकेचा विकास आराखडयास अंतिम मंजूरी न मिळाल्याबाबत

**(१०) ४१५९९ (१३-०५-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिकेचा विकास आराखडा मागील अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे सांगली, मिरज व कुपवाड या तिन्ही शहरांचा विकास होत नसल्याची बाब समोर आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा विकास आराखडा लवकरात लवकर मंजूर व्हावा व मंजूर होण्यापूर्वी संबंधीत महानगरपालिका क्षेत्रातील मा.विधानसभा सदस्यांची बैठक घेणेबाबतचे निवेदन संबंधीत सदस्यांनी शासनास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या विकास आराखडया संदर्भातील नागरिकांच्या सर्व सूचना व हरकती शासन विचारात घेणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०३-२०१७) :**(१) व (२) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या विकास योजनेच्या भागश: क्षेत्रास दि ०४/०४/२०१२ रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूरी दिली आहे. तसेच उर्वरित वगळलेल्या क्षेत्रासाठीच्या विकास योजनेस (E.P.) दि.०३/०३/२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूरी दिली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शासनाने सांगली - मिरज - कुपवाड महानगरपालिकेच्या विकास योजनेस उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर मंजूरी दिलेली आहे. या विकास आराखड्या संदर्भातील नागरिकांच्या विहीत मुदतीत प्राप्त सूचना व हरकतींचा गुणवत्तेनुसार विचार करण्यात आलेला आहे. तसेच सदर सूचना / हरकत धारकांना विकास योजना नियोजन समिती समोर तसेच प्राधिकृत अधिकारी तथा सहसंचालक नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचेसमोर रितसर सुनावणी देखील देण्यात आली आहे.

(५) लागू नाही.

---

**शिर्डी (ता.राहता, जि.अहमदनगर) येथे रुग्णाला कचरा उचलण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या घंटा गाडीतून रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आल्याबाबत**

**(११) ४५७८२ (१६-०५-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (ता.राहता, जि.अहमदनगर) येथे अनाथ रुग्णाला शिर्डी नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी कचरा उचलण्यासाठी वापरली जाणाऱ्या घंटा गाडीतून राहता येथिल ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले असतांना तेथे पोहोचण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २९ जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे तदनुसार संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०१७) :**(१) दि. २८ जानेवारी, २०१६ रोजी एक अनोळखी व्यक्ती आजारी अवस्थेत दिसून आल्यानंतर सफाई ठेकेदाराकडील धुर फवारणी करण्यासाठीच्या वाहनातून सदर रुग्णालयास ग्रामीण रुग्णालय, राहता येथे नेले असता डॉक्टारांनी त्यास मृत घोषीत केले आहे.
(२) उप विभागीय अधिकारी, शिर्डी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सफाई ठेकेदाराने सादर केलेल्या स्पष्टीकरणानुसार सफाई ठेकेदाराकडील कामगारांकडून मानवतेच्या दृष्टीने त्या इसमास वैद्यकीय मदत मिळावी या उद्देशाने सदर घटना घडल्याचे दिसून आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परवडणाऱ्या घरांसाठी खाजगी भूखंड संपादन केल्यानंतर त्या बदल्यात भूखंडाच्या क्षेत्रफळानुसार २२५ टक्के इतका विकास हक्क हस्तांतर (टी.डी.आर.) देण्याबाबत**

**(१२) ४७१९२ (१७-०५-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परवडणाऱ्या घरांसाठी वा अन्य कुठल्याही योजनांसाठी खाजगी भूखंड संपादन केल्यानंतर त्या बदल्यात भूखंडाच्या क्षेत्रफळानुसार २२५ टक्के इतका विकास हक्क हस्तांतर (टी.डी.आर.) देण्याच्या शासनाच्या निर्णयाला आता शासनाने महसूली उत्पादकाचे स्वरुप दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तावित गृहनिर्माण धोरण टी.डी.आर. विकास हक्क उपलब्धतेवर शासनाने भर दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकासहक्क हस्तांतर हा मुंबईतील निवडक व बड्या विकासकांची असलेली मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी शासनाने टी.डी.आर चे वितरण हे संपूर्णपणे ऑनलाईन पध्दतीने करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विकासहक्क हस्तांतराचा दर शासनाने १०० टक्के वाढविल्याने मुंबईमध्ये घरांच्या किमती प्रचंड वाढल्या असल्याने विकास हक्क हस्तांतराच्या किंमती काही प्रमाणात कमी करण्याकरिता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१७)** :(१) व (२) शासन नगरविकास विभागाकडील दिनांक १६.११.२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमधील हस्तांतरणीय विकास हक्काच्या तरतूदीमध्ये सुधारणा मंजूर करणेत आलेल्या आहेत. मंजूर विकास योजनेमधील सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या जमिनी, जमिन मालकांनी नियोजन प्राधिकणास हस्तांतरण केल्यानंतर त्यांना देय असणारा हस्तांतरणीय विकास हक्क हा हस्तांतर केलेल्या आरक्षित क्षेत्राच्या, मुंबई उपनगरामध्ये दुप्पट व मुंबई बेट शहरामध्ये अडीच पट अनुज्ञेय रहाणार आहे. केंद्र शासनाने, यापूर्वीच्या भूमि संपादन अधिनियम १८९४ निरसित करुन नवीन भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंमलात आणल्यामुळे, सदर अधिनियमाचे तरतूदीनुसार जमिन मालकास उचित मोबदला मिळण्याचे दृष्टिकोनातून शासनाकडून वरील प्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे. सदर निर्णय हा मंजूर विकास योजनेमधील सर्व प्रकारच्या आरक्षणांना लागू आहे.
(३), (४) व (५) अशी बाब नाही.
सदर प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्याच्या दृष्टिकोनातून विकास हक्क हस्तांतरणाची व विनियोगाची प्रक्रिया ऑनलाईन प्रणालीमार्फत करण्याच्या अनुषंगाने बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर विचारधीन आहे.

---

### स्मार्ट सेवा सहकारी संस्थेकडून कर्मचाऱ्यांवर आर्थिक अन्याय होत असल्याबाबत

**(१३) ५३८७८ (२९-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेला विविध विभागांसाठी कर्मचारी पुरविणाऱ्या स्मार्ट सेवा सहकारी संस्थेकडून कर्मचाऱ्यांवर आर्थिक अन्याय होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेकडून पदवीधर युवकांना किमान वेतन कायद्याचा भंग करून वेठबिगार प्रमाणे राबवून घेतले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून संस्थेसाठी काही टक्के रक्कमही कापली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१५-०३-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

आर्थिक अन्याय होत असल्याची बाब सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली.

(२) हे खरे आहे. निरीक्षणाच्या वेळेस संगणक ऑपरेटर व बुकींग क्लार्क यांना माहे जून २०१६ पासून वेतन अदा केलेले नव्हते. (सद्या नोव्हेंबर, २०१६ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर आस्थापनेस किमान वेतन अधिनियम, १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ व कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० अंतर्गत निरीक्षण शेरे पारित केले आहेत व कायद्याच्या तरतुदीनुसार स्मार्ट सेवा सहकारी संस्थेविरुध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, शिवाजीनगर पुणे, येथे खटले दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका क्षेत्राची हद्दवाढ करण्याबाबत**

**(१४) ५४५३४ (२९-०८-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) येथील नगरपालिका क्षेत्राची हद्दवाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याचे माहे जून, २०१६ वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हद्दवाढीच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.

कुळगाव बदलापूर नगरपालिका क्षेत्राची हद्दवाढ करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून अद्याप प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापुर जिल्हयाच्या विकास आराखड्याबाबत**

**(१५) ५५६७४ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्हयाचा पुढील २० वर्षाचा प्रादेशिक विकास आराखडा तयार करण्याचे काम गत ९ वर्षापासुन सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रादेशिक विकास आराखडा नसल्यामुळे पर्यटन, नागरी विकास व ग्रामीण भागाचा विकास रखडला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रादेशिक विकास आराखडयाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही. कोल्हापूर प्रदेशाची प्रारुप प्रादेशिक योजना तयार करणेत आलेली असून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १६ (१) अन्वये उक्त प्रारुप प्रादेशिक योजनेची सूचना सदस्या सचिव, कोल्हापूर प्रादेशिक नियोजन मंडळ, कोल्हापूर यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजी प्रसिध्द केलेली आहे. उक्त सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग १ पुणे विभागीय पुरवणी मध्ये दिनांक २२-२८, सप्टेंबर, २०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) कोल्हापूर प्रदेश क्षेत्राकरिता प्रारुप प्रादेशिक योजनेची सूचना प्रसिध्दीकरणानंतर प्राप्त सूचना व हरकतींच्या अनुषंगाने संबंधित सूचना/हरकत धारकांना प्रादेशिक योजना नियोजन समिती मार्फत रितसर सुनावणी देण्यात आलेली आहे. सदर सुनावणीअंती सविस्तर छाननी करुन व अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर नियोजन मंडळाकडून प्रारुप प्रादेशिक योजना शासनास मंजूरीकरिता सादर करण्यात येईल.

---

**मुंबई महापालिका आयुक्तांच्या सचिवाला लाच घेताना पकडल्याबाबत**

**(१६) ५६९३५ (२६-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिका आयुक्तांच्या सचिवाला एका ठेकेदाराकडून लाच घेताना रंगेहात पकडले असतानासुध्दा सदर सचिवास प्रभाग अधिकारी पदी बढती देण्यात आल्याचे माहे मे, २०१६ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यातील ३९ उद्योगांनी सुमारे २ लाख कामगारांचा भविष्य निर्वाह निधीची रक्कम गिळंकृत केल्याबाबत**

**(१७) ५८९९० (२९-०८-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील ३९ उद्योगांनी सुमारे २ लाख कामगारांची भविष्य निर्वाह निधीची (पीएफ) रक्कम गिळंकृत केल्याचे नुकतेच माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपन्यांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने (पीएफ ऑफिस) नोटीसा बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासन स्तरावर चौकशी करुन उक्त दोषी कंपन्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-०३-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

१८ उद्योगांची सुमारे १५०१२ कामगारांची मे, २०१६ महिन्याची भविष्य निर्वाह निधीची रक्कम प्राप्त झाली नव्हती.

(२) कामगारांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम केंद्र शासनाच्या क्षेत्रिय भविष्य निर्वाह निधी आयुक्त, उप क्षेत्रिय कार्यालय, औरंगाबाद यांनी कामगारांचे भविष्य निर्वाह निधीची रक्कम जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

(३) सदर रक्कम जमा न केल्यास केंद्र शासनामार्फत संबंधितांवर कर्मचारी प्रकीर्ण उपबंध अधिनियम १९५२ अंतर्गत योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रेसिजन फोरजिन ॲण्ड स्पापिंग कंपनीमध्ये काम करणाऱ्या कामगाराचा मशिनमध्ये अडकून मृत्यू झाल्याबाबत**

**(१८) ६१४३३ (२९-०८-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सातपुर औद्योगिक वसाहतीमध्ये प्रेसिजन फोरजिन ॲण्ड स्पापिंग कंपनीमध्ये काम करणाऱ्या भूषण प्रमोद महाजन (३२, रा. सिडको) यांचा कंपनीमध्ये सेवेत असतांना दिनांक २६ मे, २०१६ रोजी मशिनमध्ये अडकून मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या मृत्यूमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई त्यांच्या कुटुंबीयांना देण्याबाबत कंपनी प्रशासनाने कुठल्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कंपनीकडून नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच मृत व्यक्तीच्या वारसास कंपनीच्या सेवेत घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर मृत कामगाराच्या पत्नी व आईस राज्य कामगार विमा योजना, नाशिक यांच्यामार्फत नुकसान भरपाई म्हणून दरमहा पेन्शन सुरु करण्यात आलेली आहे. व्यवस्थापनाने मृत कामगाराच्या वारसास सानुग्रह अनुदान दिले नाही.
(३) मृत कामगाराच्या वारसाने नोकरी करण्यास नकार दिल्याचे व्यवस्थापनाने कळविले आहे. अपघाताप्रकरणी व्यवस्थापनाविरुध्द नाशिक न्यायालयात दोन फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहरासह ग्रामीण भागात बालकामगार कार्यरत असल्याबाबत**

**(१९) ६२१८३ (२९-०८-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहरासह ग्रामीण भागातील प्रत्येक दुकान, हॉटेल व अन्य कष्टाची कामे केल्या जाणाऱ्या ठिकाणी बालकामगार कार्यरत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने बालमजूरी रोखण्याबाबत कायदा करुन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१७-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) शासन निर्णय दि. २५.४.२००६ व दिनांक २.३.२००९ नुसान ३५ जिल्ह्यांमध्ये संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या कृती दलालामार्फत धाडसत्रांचे आयोजन करुन बाल कामगारांची मुक्तता करण्यात येते. बाल कामगारांना कामावर ठेवणाऱ्या मालकाविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद नोंदविली जाते व पोलीसांमार्फत न्यायालयामध्ये खटले दाखल केले जातात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा नगरपरिषदेच्या रस्ते व नालीच्या बांधकामातील अनियमितता**

**(२०) ६३२७३ (२९-०८-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा शहरात युडी ६ एम.सी. योजनेंतर्गत सन २०१४-२०१५ दरम्यान मुस्लीम लायब्ररी चौक ते त्रिमूर्ती चौक पर्यंत नाली बांधकाम तसेच याच योजनेंतर्गत रस्ते बांधकाम करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्ते बांधकामात मुरूम ऐवजी मातीचा उपयोग करण्यात आला असुन १ फुट खोदाई करुन गिट्टी टाकण्याचे अंदाजपत्रकात नमूद असतांना प्रत्यक्षात ४ ते ६ इंच खोदाई करून गिट्टी व मातीचा भरणा करण्यात आला. तसेच नालीचे बांधकाम सुद्धा दर्जेदार नसल्यामुळे नाली तुटून सांडपाण्याचा मोठा प्रश्न भविष्यात निर्माण होईल अशी तक्रार लोकप्रतिनिधीमार्फत शासनाकडे दिनांक ११ जून, २०१५, ४ जुलै, २०१५, १९ ऑगस्ट, २०१५ व २१ डिसेंबर, २०१५ या तारखांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंबंधी चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंबधी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

(३) व (४) प्रश्नातील रस्ते बांधकाम व नाली बांधकामाच्या संदर्भात शासकिय तंत्र निकेतन महाविद्यालय गडचिरोली या त्रयस्थ संस्थेमार्फत सदर कामांचे लेखापरिक्षण करण्यात आले असून दोन्ही कामे समाधानकारक असल्याचा अहवाल सदर संस्थेने दिला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### उमरखाडी (मुंबई) येथील हन्ज हाउस या इमारतीच्या अनधिकृत बांधकामाबाबत

**(२१) ६३२९७ (२९-०८-२०१६). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील डोंगरी भागातील उमरखाडी येथील आनंदराव सुर्वे रस्त्यावर हन्ज हाउस ही इमारत तळ मजला व एक मजला अशा स्वरुपात उभी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागा उद्यानासाठी आरक्षित असून भूमाफियांनी सदर आरक्षण बदलले असून वेळेत बांधकाम न पाडल्यास स्थानिक जनतेला उद्यानाला मुकावे लागेल अशी तक्रार अखिल डोंगरी जनजागृती कृती समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) मंजूर पुनर्रचित विकास आराखडा १९९१ तसेच विकास नियोजन आराखडा, २०३४ (मे, २०१६ नुसार) हन्ज हाऊस (सर्वे नं.१९९२) हा भुखंड उद्यानासाठी आरक्षित आहे. सदर बाबतीत कोणतेही आरक्षण बदलेले नाही.

अनधिकृत बांधकाम संदर्भात अखिल डोंगरी जनजागृती कृती समितीने महानगरपालिकेमध्ये तक्रार केलेली आहे.
(३) अनधिकृत बांधकामावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये संबंधितांवर स्थानिक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वणी (जि.यवतमाळ) शहरात तीन तलावांपैकी दोन तलावांवर अतिक्रमण झाल्यामुळे एकमेव शिंगाडा तलाव शिल्लक असल्याबाबत

**(२२) ६३९६७ (२४-०८-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) शहरात तीन तलावांपैकी दोन तलावांवर अतिक्रमण झाल्यामुळे एकमेव शिंगाडा तलाव शिल्लक असून त्यावरही २० टक्के अतिक्रमण झाल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तलावांमुळे शहरातील भूगर्भातील पाणी पातळी कायम राखण्यास मदत होत होती मात्र आता शिल्लक असलेल्या शिंगाडा तलावातही मोठ्या प्रमाणात सांडपाणी जात असल्यामुळे कृत्रिम झरे आटले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू शिंगाडा तलावाचे अतिक्रमण रोखून त्याचे सौदयीकरण करण्याबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७) :**(१) मुख्याधिकारी, नगरपरिषद वणी, जि.यवतमाळ यांच्या अहवालानुसार शिंगाडा तलावावर २० टक्के अतिक्रमण झाल्याची बाब खरी नाही.
(२) सदर तलावात काही प्रमाणात शहरातील सांडपाणी जाते, मात्र कृत्रिम झरे आटलेले नाहीत.
(३) या तलावाचे खोलीकरण व सौंदर्यीकरण करण्यास नगरपरिषदने अंदाजपत्रक तयार केले असून, प्रशासकीय मंजूरी व तांत्रिक मंजूरी प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तळेगाव दाभाडे येथील सांडपाणी गावतळ्यात सोडल्याने धोकादायक झाल्याबाबत

**(२३) ६४४१३ (२६-०८-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे शहरातील सांडपाणी गावतळ्यात सोडल्याने तळ्यातील पाणी प्रदुषित झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळ्याच्या कडेलाच वसलेल्या भाई आळीतील शंभर कुटुंबियांचा मच्छिमार व्यवसाय याच तळ्यातील पाण्यावर अवलंबून होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळ्यामध्ये जाणारे सांडपाणी रोखण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वेळोवेळी नगरपरिषदेस कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर तळयाचे प्रदुषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७) :**(१), (२), (३) व (४) तळेगाव-दाभाडे शहरातील गावतळयात सोडण्यात येणा-या सांडपाण्याचा मार्ग बदलून ते तळयाच्या कडेने जाणा-या गटारात सोडण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषदे मार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरात गृहयोजना राबविण्याबाबत

**(२४) ६५०३४ (१०-०१-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात गृहयोजना राबवण्यासाठी म्हाडा मुंबईत जमीन विकत घेणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत गृहयोजना राबविण्यासाठी म्हाडाचे उपनगरातील बोरीवली येथे २९, गोरेगाव येथे ९, वांद्रा येथे ४, कुर्ला येथे २१ व मुलुंड येथे ११ असे एकूण ७७ मोकळे भूखंड रिकाम्या अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भूखंडावर म्हाडाने गृहयोजना राबविल्यास हजारो घरे म्हाडाला विक्रीसाठी उपलब्ध होऊन मुंबईकरांची घरांची गरज भागविली जावू शकते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) मुंबई शहरामध्ये म्हाडाच्या रिक्त भुखंडांवर म्हाडातर्फे गृहनिर्माण योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

तसेच काही भुखंडांवर महानगरपालिकेची आरक्षणे असून सदर आरक्षणाखालील भुखंड विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदींच्या अधीन राहून विकसित करण्यात येत आहेत.

(३) व (४) मुंबई शहरात असलेली जागेची कमतरता लक्षात घेता वसाहतीतील उपलब्ध भुखंडांचा जास्तीत जास्त उपयोग करुन परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्याच्या उद्देशाने मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत प्रचलित विनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु आहे. त्यातून विक्रीसाठी घरे उपलब्ध होणार आहेत.

---

**मुंबईत लेप्टोस्पायरोसीसच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत**

**(२५) ६५०४२ (१०-११-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत लेप्टोस्पायरोसीसच्या १९ रुग्णांची माहे ऑगस्ट, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात नोंद झाली असून १०१ संशयित (लेप्टो) रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून लेप्टो पायरेसीस या आजाराने गोवंडी भागातील गैतमनगर या झोपडपट्टीत राहणाऱ्या एका १८ वर्षीय महिलेचा दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी सायन रुग्णालयात निधन झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत पसरत असलेला लेप्टो आटोक्यात आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्वजनिक आरोग्य खात्यामार्फत ताप रुग्ण सर्वेक्षण व इतर प्रतिबंधक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

(३) बृहमुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत साथीच्या आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार खालील उपाययोजना राबविण्यात येतात :-

- वैद्यकीय आरोग्य अधिकारी व त्यांच्या अखत्यारितील कर्मचाऱ्यांमार्फत तबेल्यांच्या परवान्यांची पाहणी करण्यात येते. परवान्यापेक्षा अतिरिक्त जनावरांची संख्या असल्यास जप्तीची कारवाई करण्यात येते. अस्वच्छ आढळलेल्या तबेला मालकांवर मुंबई महानगरपालिकेमार्फत कलम ३९४ अंतर्गत कारवाई करण्यात येते.
- तबेला मालकांनी तबेल्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांची नियमितपणे नोदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.
- महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यामार्फत प्रमाणीत केलेली जंतू नाशके योग्य प्रमाणात वापरण्याबाबत तसेच जनावरांचे मलमुत्र निर्जंतूक केल्यानंतर महानगरपालिकेच्या नाल्यामध्ये सोडण्याबाबत महानगरपालिकेच्या सहाय्यक मुख्य परीवेक्षक यांच्याकडून तपासणी करण्यात येते.

- महानगरपालिकेमार्फत पाणी साठा केलेल्या जागांची तपासणी करुन डासांची पैदास आढळून आल्यास डास नियंत्रण कारवाई करण्यात येते.
- तबेल्याला पाणीपुरवठा जोडणी आढळल्यास पाईप लाईनची जोडणी आढळल्यास महानगरपालिकेच्या जल खात्यामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येते.
- तबेला मालकांनी पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत तबेल्यातील जनावरांची नियमितपणे तपासणी करुन घेणे बंधनकारक केले आहे.
- पाळीव कुत्र्यांच्या परवान्याचे नुतनीकरण करताना कुत्र्याच्या मालकांनी त्याच्या कडील पाळीव कुत्र्यांना लेप्टो स्पायरोसिस प्रतिबंधक लस देण्याचे बंधनकारक केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जवाहरलाल नेहरू अर्बन रिन्युएबल मिशन अंतर्गत बांधलेल्या घरांबाबत**

**(२६) ६५०५५ (१०-११-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात जवाहरलाल नेहरू अर्बन रिन्युएबल मिशन (जेएनयुआरएम) योजने अंतर्गत बांधलेली ८६ हजार ५१९ घरे रिकामी असल्याचे दिनांक २५ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजने अंतर्गत महाराष्ट्रात १ लाख ७६ हजार घरांना मंजुरी देण्यात आली होती त्यापैकी १ लाख २९ हजार घरे तयार झाली असुन त्यापैकी ८६ हजार ५१९ घरे रिकामी पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घरांचे लाभार्थी कोण आहेत व त्यांना ही घरे केव्हा देण्यात येणार आहेत तसेच सदर घरे आतापर्यंत न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-०३-२०१७)** :(१) व (२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत शहरी गरीबांना मुलभूत गरजा पुरविणे (BSUP) व एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) या योजनांची अंमलबजावणी दि. २५ जून, २००७ च्या शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे. केंद्र शासनाने योजनेंतर्गत एकूण १,७५,०३२ घरकुलांना मंजूरी देण्यात आली होती. या योजनेसंदर्भात मुख्य अभियंता-२ सुकाणू अभिकरण, म्हाडा यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहे जानेवारी, २०१७ च्या मासिक प्रगती अहवालनुसार घरकुलांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे : -

| योजना | मंजूर घरकुले | पुर्ण / तयार घरकुले | प्रगती पथावरील घरकुले | वितरीत घरकुले |
|---|---|---|---|---|
| BSUP | ९७१४७ | ७८७३८ | १३,४२२ | ६६,१३१ |
| IHSDP | ७७८८५ | ५८०९७ | ११,७१४ | ३३,१५७ |
| एकूण | १,७५,०३२ | १,३६,८३५ | २५,१३६ | ९९,२८८ |

उपरोक्त विवरणपत्रातील आकडेवारीचा तपशील पहाता, तयार घरकुलांपैकी एकूण ३७५४७ (१३६८३५-९९२८८) इतकी घरकुले वितरीत करणे अद्याप शिल्लक आहेत.

(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व निकषांची पूर्तता केल्यानंतर संबंधित महानगरपालिका / नगरपालिकांकडून लाभार्थी निश्चितीनंतर पात्र लाभार्थ्यांस घरकुलाचे वाटप करण्यात येते. आतापर्यंत घरकुल वितरीत न करण्याची कारणे साधारणपणे खालीलप्रमाणे आहेत.

१) या दरम्यान लाभार्थ्यांनी स्वखर्चाने पक्की घरे बांधलेली आहेत.

२) लाभार्थी स्थानांतरण करुन अथवा राहते घर सोडून इतरत्र जाण्याची इच्छा नाही.

३) लाभार्थी हिस्सा प्राप्त न होणे.

४) घरकुलांचे कामे पूर्ण झाली आहेत. तथापि, बाह्य सुविधांची कामे अपूर्ण आहेत.

---

**कटारे मिल (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) बंद करण्यात आल्याबाबत**

**(२७) ६५१४१ (१६-१२-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) तामलवाडी परिसरातील ३५ वर्षापूर्वी पासून चालू असलेली कटारे मिल माहे सप्टेंबर, २०१६ च्या सुमारास बंद करण्यात आली असल्याने मिलमध्ये काम करणारे १५०० कामगार बेरोजगार झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बेकार झालेल्या कामगारांची उपासमार होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही. कच्चा माल उपलब्ध होत नसल्याने व विजेचे दर वाढल्यामुळे मालक व कामगार प्रतिनिधी यांच्यात बैठकीच्या माध्यमातून आपापसात झालेल्या तोंडी सहमतीने दिनांक १/९/२०१६ ते ९/११/२०१६ या कालावधीत मिल तात्पुरती बंद ठेवण्यात आली होती. मात्र सद्य:स्थितीत सदरहू मिल पूर्ववत सुरु आहे.

(२) होय, चौकशीअंती मिलमध्ये एकूण २०४ कायम/हंगामी कामगार असल्याचे आढळून आले आहे. तसेच मिलमधील उत्पादन प्रक्रिया पूर्ववत सुरु झाली असून सद्य:स्थितीत कोणत्याही कामगारास कामावरुन कमी करण्यात आले नसल्याचेही आढळून आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुर्डूवाडी (जि.सोलापूर) नगरपालिकेने शेतकऱ्यांना भाजी विक्रीकरिता दिलेल्या जागेबाबत**

**(२८) ६५३७० (१६-०१-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्डूवाडी (जि.सोलापूर) येथे नगरपालिका प्रशासनाने शेतकऱ्यांना भाजी विक्रीसाठी जागा नेमून दिल्यानंतर तेथील २५ व्यापाऱ्यांनी त्यांची जागा बळकावली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतच्या तक्रारी माहे ऑगस्ट, २०१६ पासून शासन, पोलिस व नगरपालिका प्रशासनाकडे करुनही कोणतीच कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७) :**(१) हे खरे नाही

(२) कुर्डूवाडी शहरात भाजी विक्री करणेसाठी येणा-या शेतक-यांना नगरपालिकेचे आझाद मैदान मध्ये भाजी विक्री करणेकरीता स्वतंत्र व्यवस्था करणेबाबत शेतकरी संघटनेने कुर्डूवाडी नगरपालिकेकडे अर्ज दाखल केला होता. नगरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्र.१५२ दिनांक २२.०९.२०१६ अन्वये आझाद मैदान येथे शेतक-यांना भाजी विक्रीसाठी बसणेकरिता दोन ओळी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूरच्या अंबाबाई मंदिराच्या आवारात भाविकांकरिता सोईसुविधा देण्याबाबत**

**(२९) ६५८३० (०९-०१-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुरातील अंबाबाई, श्री.क्षेत्र जोतीबा, न्यू पॅलेस, पन्हाळा आणि जिल्हयाला मिळालेले निसर्गाचे वरदान यामुळे कोल्हापूरकडे पर्यटकांची दरवर्षी गर्दी वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूरच्या अंबाबाई मंदिराच्या आवारातील भाविकांकरिता स्वच्छतागृह, महिलांसाठी स्वतंत्र चेजिंग रुम नसणे, अपुरे पार्किंग , वाढती अतिक्रमणे, दिशादर्शक फलकांची दुरवस्था झाली आहे तसेच कोल्हापूर शहरात यात्री निवासाची पार्किंगची सुविधा नसल्याने शहरात पार्किंगची समस्याही वाढत चालली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सदंर्भात वारंवार भाविकांनी तसेच स्थानिकांनी तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१७)** :(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सन २०१६-१७ मध्ये महालक्ष्मी मंदिर परिसरातील प्रांत ऑफिय समोरील जागेमध्ये पुरुषांसाठी व महिलांसाठी प्रत्येकी सहा अशी एकूण बारा स्वच्छतागृहे उभारण्यात आलेली आहेत.

कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महालक्ष्मी मंदिर परिसरामध्ये सरस्वती टॉकीज, विद्यापीठ हायस्कूल व बिंदू चौक या ठिकाणी भाविक व पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

सन २०१२-१३ मध्ये महापालिकेने ९४ ठिकाणी, सन २०१३-१४ मध्ये एचडीएफसी बँकेमार्फत ५० ठिकाणी, सन २०१४-१५ मध्ये विरशैव बॅकेमार्फत ३० ठिकाणी व महापालिकेतर्फे १५७ ठिकाणी फलक बसविण्यात आलेले आहेत.

कोल्हापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकामार्फत महालक्ष्मी मंदिर परिसरातील अतिक्रमण केलेल्या फेरीवाल्यांना व विक्रेत्यांना हटविण्याची कार्यवाही प्राधान्याने केली जात आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

## कुरुंदवाड नगरपालिकेतील (जि.कोल्हापूर) रिक्त पदांबाबत

**(३०) ६६४९६ (१६-०१-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरुंदवाड नगरपालिकेतील (जि.कोल्हापूर) राज्य संवर्गातील १४ पैकी ११ जागा व लिपिक संवर्गातील १० पैकी ९ जागा रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ही रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७)** :(१) होय.

(२) आस्थापना खर्चाची टक्केवारी शासन धोरणानुसार जास्त असल्याने रिक्त पदे भरण्यात आली नाहीत.

(३) याबाबत दिनांक २५.०३.२०१७ च्या पत्रान्वये आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांना त्यांचे स्तरावरुन जिल्हाधिकारी कोल्हापूर व मुख्याधिकारी, नगरपरिषद कुरुंदवाड, जि.कोल्हापूर यांची बैठक आयोजित करुन नियमानुसार रिक्त पद भरती करणेबाबत सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गिरणी कामगारांसाठी २६०० घरांची सोडत काढण्याबाबत**

**(३१) ६६५९२ (१६-०१-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणी कामगारांसाठी २६०० घरांची सोडत माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये एमएमआरडीएच्या माध्यमातून काढण्याची घोषणा शासनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन महिन्याचा कालावधी उलटून गेला तरी अद्याप गिरणी कामगारांच्या घरांची सोडत काढण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-०३-२०१७) :**(१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी मौजे कोन, ता.पनवेल, जि.रायगड येथे बांधलेल्या (१६० चौ.फु. + १६० = ३२० चौ.फु) एकूण २४१७ सदनकिांची दि. ०२.१२.२०१६ रोजी म्हाडामार्फत संगणकीय सोडत रंगशारदा सभागृह वांदे (पश्चिम) मुंबई- ५२ येथे काढण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर नगरपरिषदेच्या स्वयंरोजगार कार्यक्रमाबाबत**

**(३२) ६६९५२ (१६-०१-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर नगरपरिषदेने (ता.जि.पालघर) स्वयंरोजगार कार्यक्रमाद्वारे १६ लाभार्थ्यांना वैयक्तिक व्यवसाय योजनेमधून दिलेल्या घंटागाडयाची ३ महिन्यांची देयके नगरपरिषदेने थकविल्यामुळे लाभार्थ्यांनी बँकेकडून घेतलेले कर्जाचे हप्ते भरणे अवघड जात असून त्यात पालिकेने प्रतिदिन रुपये ४६० कमी केल्यामुळे लाभार्थी दुहेरी संकटात सापडले असून लाभार्थ्यांनी आपल्या गाडया दिनांक ४ जुलै, २०१६ रोजीपासुन नगरपरिषदेच्या आवारातच उभ्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार लाभार्थ्यांना कामाचा योग्य तो मोबदला मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१७) :**(१) व (२) जून, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या तीन महिन्याची बिले अदा करण्यात आलेली नव्हती हे खरे आहे. तथापि, माहे सप्टेंबर, २०१६ पासून ते आजपर्यंत लाभार्थ्यांना कामाचे संपूर्ण देयके अदा करण्यात आलेली असून वरील थकीत रक्कम अदा करण्याबाबत नगरपरिषद पालघर, यांच्या प्रस्तावास जिल्हाधिकारी पालघर यांचेकडून महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३३७ कार्योत्तर मंजूरी देण्यात आलेली आहे.

सद्य:स्थिती घंटागाडीमार्फत कचरा संकलनाचे काम सुरळीत पणे सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोल्हापूर शहर पाणीपुरवठा विभागातील शिंगणापूर चुंबखडी येथील पाण्याच्या टाकीबाबत

**(३३) ६७१८८ (१६-०१-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहर पाणीपुरवठा विभाग शिंगणापूर चुंबखडी येथील पाण्याची टाकी सुमारे २५ लाख लिटर क्षमतेची असून उपनगरास ७० टक्के पाणीपुरवठा या टाकीतून करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टाकीचा परिसर हा घाण, रस्ता, दिवाबत्ती, पहारेकरी अशा अनेक समस्यांनी ग्रासला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाण्याची टाकी सुस्थितीत ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

चुंबखडी येथील पाण्याची टाकी ९५ लाख लिटर क्षमतेची असून या टाकीतून शहरातील एकूण ४० टक्के भागात पाणी पुरवठा करण्यात येतो.

सदर ठिकाणी रस्ता व दिवाबत्तीची सोय उपलब्ध असून दिवस- रात्र शिफ्ट मध्ये कर्मचारी कार्यरत असतात.

(३) सदरची टाकी सुस्थितीत असून कोल्हापूर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडून वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबई शहरातील आरेतील आदिवासी पाड्यातील जनतेच्या पुनर्वसनाबाबत

**(३४) ६७२३२ (१६-०१-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील आरेतील आदिवासी पाड्यातील जनतेचे पुनर्वसन होत नाही तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात मूलभूत सोयीसुविधा देण्यासाठी हरित लवादाकडून परवानगी घेण्यात यावी व तीन आदिवासी पाड्यांच्या पुनर्वसनासाठी सर्वेक्षण करण्याचे निर्देश मुख्य सचिवांनी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०१७) :**(१) मुंबई शहरातील आरे येथील आदिवासी पाड्यातील जनतेचे पुर्नसन होत नाहीत तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात मूलभूत सोयीसुविधा देण्यासाठी हरित लवादाकडून परवानगी घेण्यात यावी आणि तीन आदिवासी पाड्यांच्या पुनर्वसनासाठी सर्वेक्षण करण्याचे निर्देश मा.मुख्य सचिव महोदयांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या बैठकीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला दिल्याचे सदर बैठकीच्या इतिवृत्तावरुन दिसून येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महापालिकेने लीजवर दिलेल्या भूखंडावरील उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(३५) ६७४१७ (१६-१२-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिकेने पन्नास वर्षापूर्वी लीजवर दिलेल्या भूखंडावरील सुमारे तीन हजार उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर निर्णय घेतला असल्यास त्याचे स्वरूप काय आहे व सदरहू इमारतीत राहणाऱ्या भाडेकरुंना किती चौरस फुटाचे घर मिळणार आहे,
(३) असल्यास, झोपडपट्टीवासियांना पुनर्विकासासाठी चार एफ.एस.आय. दिला जातो त्याप्रमाणे उपकर प्राप्त इमारतीनांही चार एफ.एस.आय. देण्याबाबत समिती नियुक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१७) :**(१) व (२)
अशा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केलेला नाही.
(३) व (४) अशी बाब नाही.

मुंबई शहर व उपनगरातील उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारती आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाशी संबंधित इमारतींशी निगडीत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनास सूचना करण्यासाठी शासन गृहनिर्माण विभागाकडील क्रमांक विमंका-२०१६/प्र.क्र १४२/दुवपू-१ दिनांक २९ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे.

---

**ठाणे आणि मिरा-भाईंदर शहरांना जोडण्यासाठी खाडी समांतर असा बायपास रस्ता बांधण्याबाबत**

**(३६) ६७७८२ (१६-१२-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि मिरा-भाईंदर शहरांना जोणाऱ्या घोडबंदर रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी खाडी समांतर असा बायपास रस्ता बांधण्याकरीता ८० कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाईंदर ते ठाणे असा नवा खाडी समांतर बायपास रस्त्याच्या कामाची कधीपासून सुरूवात केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) जैसलपार्क ते घोडबंदर या ३० मी. रुंदीच्या खाडी समांतर बायपास रस्त्याच्या कामासाठी सल्लागाराची नियुक्ती केली असून सद्य:स्थिती जमिनीचा सर्व्हे, भूशास्त्रीय सर्वेक्षण, अंदाजपत्रक व विस्तृत प्रकल्प आराखडा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. या कामासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून सीआरझेड विभागाच्या, भूसंपादन व आवश्यक लागणाऱ्या इतर परवानग्या तसेच सेवा वाहिन्याचे स्थलांतर व अतिक्रमणे हटविणे इ. कामे लवकरात लवकर पूर्ण करुन रिकामी जागा प्राधिकरणास हस्तांतरीत करण्यासाठी मिरा-भाईदर महानगरपालिकेकडे पाठपुरावा सुरु असून त्यांच्यामार्फत याबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**राज्यात राष्ट्रीय उद्याने, अभयारण्य आणि वनसंज्ञेत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जमिनी या हरितपट्टा (ग्रीन झोन) मध्ये येत असल्याबाबत**

**(३७) ६८०५६ (०९-०१-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय उद्याने, अभयारण्य आणि वनसंज्ञेत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जमिनी या हरितपट्टा (ग्रीन झोन) मध्ये येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरी भागातील लाखो हेक्टर हरित पट्याच्या जमिनी निवासी वापर (यलो झोन) मध्ये परिवर्तित करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य व केंद्राची परवानगी न घेता वनजमिनींचा वनेत्तर कामासाठी वापर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१७) :**(१) भागश: खरे आहे, राज्यात प्रादेशिक योजना/विकास योजना तयार करतेवेळी राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य याखालील जमिनी अनुक्रमे राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य या नावाने दर्शविण्यात येतात. तसेच वनसंज्ञेत येणाऱ्या वन विभागाच्या जागा फॉरेस्ट लँड म्हणून दर्शविण्यात येतात.

(२) अशी स्थिती दिसून येत नाही. केंद्रीय पर्यटन व वनविभागाच्या परवानगी शिवाय असे करणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रिसोड (जि.वाशिम) येथील नगरपरिषद शाळेच्या इमारतीबाबत**

**(३८) ६८१७८ (१६-१२-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) येथील नगरपरिषद शाळेच्या ब्रिटीशकालीन इमारतीची दुरावस्था झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषद मुला-मुलींची शाळा एकाच ठिकाणी आणून सुसज्ज इमारत उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेची इमारत दुरुस्त करण्यासोबतच मुला-मुलींची एकत्र शाळा उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७) :**(१) (२) व (३) रिसोड नगर परिषद क्षेत्रामध्ये एका इमारतीमध्ये कन्या शाळा, एका इमारतीमध्ये उर्दू शाळा व सर्व्हे नं.४४१ मधील नगरपरिषदेच्या मालकिच्या इमारतीमध्ये खाजगी शाळा भरत आहे. खाजगी शाळा भरणारी इमारत ही संबंधीत संस्था चालकाकडून रिकामी करुन घेण्यासाठीची कार्यवाही करण्यात येत आहे व नगरपरिषदेच्या शाळा ज्या इमारतीमध्ये भरतात त्याची दुरुस्ती प्रस्तावीत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दादर येथील राधाबाई कॉटेज या इमारतीच्या विकास कामाबाबत**

**(३९) ६९३१२ (१६-०१-२०१७). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर येथील राधाबाई कॉटेज या इमारतीच्या विकासासाठी मे. योगीराज डेव्हलपर्स गत ६ वर्षापासुन विलंब लावत असल्यामुळे रहिवाश्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासकास बदलण्याबाबत प्रस्ताव कार्यकारी अभियंता (ग उत्तर) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्वसन मंडळ यांनी शासनास मान्यतेसाठी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१७-०३-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) माहिम विभागातील विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेल्या इमारतींच्या भूसंपादनाचा व त्यांच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव म्हाडाव्दारे शासनास पाठविण्यात आला असून हा प्रश्न फक्त माहिम मतदार संघापूरता मर्यादित नसून मुंबई शहर बेटावरील पुनर्विकास रखडलेल्या सर्वच उपकरप्राप्त इमारतींबाबत आहे. सबब, मुंबई शहर बेटावरील अशा इमारतींची विभागनिहाय माहिती, या इमारतींच्या भूसंपादनाकरिता तसेच म्हाडाव्दारे पुनर्विकासकरिता येणाऱ्या खर्चाची माहिती, पुनर्विकास कालावधीत भाडेकरु/रहिवाश्यांच्या राहण्याच्या दृष्टीने संक्रमण शिबीरांची उपलब्धता यासर्व बाबींची माहिती म्हाडाव्दारे प्राप्त करुन घेण्यात येत आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर अशा मालमत्तांच्या पुनर्विकासासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबतचा धोरणात्मक निर्णय शासन स्तरावर घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

### सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेमध्ये रोस्टर (बिंदुनामावली) नसतानाही नोकरभरती केल्याबाबत

**(४०) ७००८२ (१६-०१-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेमध्ये रोस्टर (बिंदुनामावली) नसतानाही सन २००५ व २०११ मध्ये बेकायदा नोकरभरती केल्याची बाब माहे सप्टेंबर २०१६, मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची वस्तुस्थिती काय आहे तसेच बिदुंनामावली नुसार कोणकोणती पदे मंजूर आहेत व कोणकोणती पदे बेकायदेशीर भरण्यात आली आहेत,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन संबंधीत दोषीविरोधत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) सन २००५ व सन २०११ मध्ये सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेत सरळसेवेने नोकर भरती झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या रुग्णालयाबाबत

**(४१) ७००८४ (१६-०१-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या प्रसूतीगृहामध्ये महिलांना डॉक्टर नसल्याचे सांगून इतर खाजगी व सिव्हील रुग्णालयात पाठविण्यात येत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाअंतर्गत १० रुग्णालये बांधणे प्रस्तावित असुन ही रुग्णालये बांधण्यापूर्वीच कर्मचारी भरती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या रुग्णालयातील मशीन्स वापराविना नादुरुस्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधीत दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१७)** :(१) प्रस्तुतीकरीता ॲडमिट झालेल्या रुग्णांमध्ये आई किंवा बाळाच्या जिविताला धोका असल्यास पुढील उपचाराकरीता पदमभूषण वसंतदादा पाटील, शासकीय रुग्णालय, सांगली येथे प्रसुतिगृहाच्या रुग्णवाहिकेने पाठविले जाते. कोणत्याही रुग्णाला खाजगी रुग्णालयात पाठविले जात नाही.

(२) राष्ट्रीय शहर आरोग्य अभियानांतर्गत नविन रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात महापालिकेच्या मालकीच्या इमारतीमध्ये रुग्णालय चालू करुन त्याकरीता भरती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यामार्फत आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांना वैद्‌यकीय सेवा देण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

महापालिकेच्या रुग्णालयातील उपलब्ध मशीन्स वापरात व चालू अवस्थेत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या मालमत्ता नाममात्र किंमतीत भाडयाने दिल्याबाबत

**(४२) ७००९५ (१६-०१-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या हजारो मालमत्ता नाममात्र किंमतीत भाडयाने दिल्यामुळे महानगरपालिकेचे कोटयवधी रुपयांचे नुकसान होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये किती प्रकारच्या व कोणकोणत्या मालमत्ता भाडयाने देण्यात आल्या आहेत तसेच सदर मालमत्तापासून महानगरपालिकेस वार्षिक किती रुपये उत्पन्न मिळते,
(३) असल्यास, या मालमत्तांचे मुल्यांकन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या मालमत्तांचे तात्काळ मुल्यांकन करण्याबाबत तथा करार नुतनीकरण करुन महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०३-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

तत्कालीन नगरपालिका असतांना सांगली नगरपालिका व मिरज नगरपालिका यांनी नगरपालिका कायद्यानुसार क्रीडा संस्था व सामाजिक संस्थांना निश्चित केलेल्या भाडयाने व सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेऊन खुल्या जागा, इमारती व गाळे भाड्याने देत होते.

सन १९९८ ला महापालिका स्थापन झाल्यानंतर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७९ (ड) नुसार चालू बाजार भावाप्रमाणे सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडून भाडे निश्चित करुन व महासभेच्या ठरवाने मिळकती भाड्याने देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील अवैध बांधकाम निष्कासित करण्याबाबत**

**(४३) ७१११९ (१६-०१-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील प्रमुख १२ नाल्यांचा मार्ग वळविण्यात आल्यामुळे तसेच नाल्याशेजारी बांधकामाना परवानगी दिल्यामुळे आजुबाजूच्या इमारतीमध्ये पाणी जाऊन मोठ्या प्रमाणात वित्त्त हानी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाल्याशेजारी अवैध बांधकाम करु नये असा शासन नियम असतांनाही प्रशासनाने नाल्याशेजारी बांधकामांना मंजूरी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, कोल्हापूर शहरातील नाल्याशेजारील अवैध बांधकाम निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१७)** :(१) व (२) हे खरे नाही.

कोल्हापूर शहरातील प्रमुख १२ नाल्याचा भाग वळविण्यात आलेला नाही तसेच इमारतीमध्ये पाणी जाऊन मोठ्या प्रमाणात वित्त हानी झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

कोल्हापूर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार बांधकामांना मंजूरी देण्यात आलेली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील प्रमुख लांब पल्ल्यांच्या १५४ रस्त्यांपैकी ५९ रस्त्यांचे सर्व्हेक्षण करण्यात आल्याबाबत**

**(४४) ७१२०२ (१६-०१-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील प्रमुख लांब पल्ल्यांच्या १५४ रस्त्यांपैकी ५९ रस्त्यांचे सर्व्हेक्षण नुकतेच महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सर्व्हेक्षणामध्ये किती रस्ते नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, तदनुसार जबाबदार असणाऱ्या ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१७)** :(१) कोल्हापूर महानगरपालिकेतर्फे एकूण ६६ रस्त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले असून खराब झालेल्या ३५ रस्त्यांचे त्रयस्त संस्थेमार्फत तांत्रिक परीक्षण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) त्रयस्त संस्था वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांचेमार्फत १८ रस्त्यांचे व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड यांचे मार्फत १७ रस्त्यांचे तांत्रिक परीक्षण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय सांगली यांनी १४ रस्ते खराब व ४ रस्ते अल्प प्रमाणात खराब झज़ल्याचा अहवाल सादर केला आहे.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड यांचा अहवाल अद्यापही प्राप्त झालेला नाही.

(३) खराब झालेले रस्ते दोष दायित्व कालावधीमधील असल्याने ठेकेदारासमवेत झालेल्या करारानुसार रस्ता तांत्रिकदृष्ट्या दुरुस्त करुन देण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असल्याने त्यांना रस्ता दुरुस्त करुन देण्याबाबत नोटीस देण्यात आल्या आहेत. त्यानुसार संबंधित ठेकेदारांना नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर ठेकेदारांच्या अनामत रक्कमेतून त्रयस्त संस्थेची सल्लागार फी अदा करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**म्हाडाच्या घरांच्या सोडतीत यशस्वी झालेल्या गिरणी कामगारांना घरे विक्रीस प्रवृत्त करणाऱ्या दलालांबाबत**

**(४५) ७१३३४ (१६-०१-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या घरांच्या सोडतीत यशस्वी झालेल्या व घर लागलेल्या गिरणी कामगारांच्या घरी जाऊन दलाल व त्यांची माणसे सदरहु घरे विकण्यासाठी त्यांना मानसिक त्रास देत आहे असल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घरांच्या सोडतीत पात्र ठरलेल्या गिरणी कामगारांचे फोन क्रमांक, पत्ते इ. माहिती या दलालांना मिळाली असून सदरची गोपनिय माहिती दलांलापर्यंत कशी पोहोचली याची चौकशी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीनुसार जबाबदार असणाऱ्या व दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०३-२०१७) :**(१) उपाध्यक्ष, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार गिरणी कामगार कृती संघटना यांच्याकडून दि. ०४/०८/२०१६ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) व (३) सोडतील यशस्वी झालेल्या गिरणी कामगारांना घरे विकण्यास प्रवृत्त करणाऱ्या दलालांना आळा घालण्याबाबतची तक्रार गिरणी कामगार कृती संघटना यांच्याकडून दि. ०४/०८/२०१६ रोजी म्हाडा कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने म्हाडा कार्यालयामार्फत वरीष्ठ पोलीस निरीक्षक खेरवाडी पोलीस ठाणे, वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१ यांचेकडे दि. ९/८/२०१६ रोजी तक्रार दाखल करण्यात आली असून खेरवाडी पोलीस स्टेशनने मागविलेल्या अतिरिक्त माहितीनुसार तक्रारीशी संबंधित ७ अर्जदारांची नावे खरेवाडी पोलीस स्टेशनाला म्हाडाच्या दि. ०६.१०.२०१६ च्या पत्राने कळविण्यात आली आहेत. त्याप्रमाणे खेरवाडी पोलीस स्टेशन, वांद्रे यांचेमार्फत पुढील चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील मेट्रो-७ या प्रकल्पाबाबत**

**(४६) ७१३५७ (१६-०१-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईकरांना वाहतुकीच्या कोंडीतून सोडविण्यासाठी व त्यांचा वेळ वाचविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ‘मेट्रो ७’ या प्रकल्पाचे कामास दिनांक ७ ऑगस्ट, २०१६ रोजीपासून सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे व सदरचे काम हे विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०१७)** :(१) होय.
(२) व (३) या प्रकल्पाची स्थापत्य कामे तीन भागामध्ये विभागलेली आहेत. सदर तिन्ही भागातील कामे प्रगतीपथावर आहेत. सदर प्रकल्प सन २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

## नांदगांव नगरपरिषदेअंतर्गत (जि.नाशिक) शाकंबरी नदीवर पूल बांधण्याबाबत

**(४७) ७१९७९ (१६-०१-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगांव नगरपरिषदेअंतर्गत नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रात शाकंबरी नदीवर स्मशानभूमीकडे जाणा-या रस्त्यावर पूल नसल्यामुळे पावसाळ्याच्या कालावधीत स्मशानभूमीत जाण्यासाठी शहरातील नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उपरोक्त रस्त्यावर पुलाचे बांधकाम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७)** :(१) होय.
(२) सदरील पुलाच्या कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासंदर्भात नगरपरिषद स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहतीमधील सुप्रिया केमिकल्स या कंपनीतील स्फोट

**(४८) ७२५०४ (१६-०१-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) लोटे औद्योगिक वसाहतीमधील सुप्रिया केमिकल्स या कंपनीत दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास स्फोट होऊन पाच कामगार गंभीर जखमी होऊन त्यापैकी एकाचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच औद्योगिक वसाहतीमध्ये नंदादीप केमिकल्स कंपनीत दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी स्फोट होऊन एक कामगार मृत झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखान्यांतील स्फोटांची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त कंपन्यामधील मृत कामगारांच्या कुटुंबियांना व जखमी झालेल्यांना उपचार व नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-०३-२०१७)** :(१) हे अंशत: खरे आहे.

सुप्रिया केमिकल्स या कंपनीत स्फोट झालेला नसून सुप्रिया लाईफसायन्स लि. या कारखान्यात रिॲक्टरमध्ये फ्लॅश फायरची घटना घडली. या घटनेत पाच कामगार जखमी झाले व उपचारादरम्यान त्यापैकी दोन कामगारांचा मृत्यू झाला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय.

सदर दोन्ही घटनांची चौकशी करण्यात आली आहे.
(४) आवश्यक खबरदारी न घेतल्यामुळे सदर घटना घडल्या आहेत. दोन्ही कारखान्यांच्या भोगवटादार विरुध्द मा.मुख्य न्याय दंडाधिकारी, रत्नागिरी यांचे न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहे.

सुप्रिया लाईफसायन्सच्या व्यवस्थापनाने सदर घटनेतील एका मृत कामगारांस रु.८,७९,८००/- व दुसऱ्या कामगारास रु.७,२५,४८०/- इतकी नुकसान भरपाईची रक्कम मा.आयुक्त, कामगार नुकसान भरपाई, रत्नागिरी यांचे न्यायालयात जमा केलेली आहे. याव्यतिरिक्त व्यवस्थापनाने सदर दोन्ही मृत कामगारांच्या वारसांना सानुग्रह अनुदान म्हणून अनुक्रमे रु.११,२०,२००/- व रु.१७,०४,५२०/- इतकी रक्कम अदा केली आहे.

तर इतर तीन जखमी कामगारांना प्रत्येकी रु.५०००/- इतकी रक्म सानुग्रह अनुदान म्हणून दिली आहे. तसेच व्यवस्थापनाने कामगारांच्या उपचाराचा खर्च केला आहे. उपचारानंतर तीन जखमी कामगार कामावर रुजू झालेले आहेत.

नंदादिप केमिकल्स प्रा.लि. ता.खेड जि.रत्नागिरी च्या व्यवस्थापनाने सदर घटनेतील मृत कामगाराच्या संदर्भात नुकसान भरपाईची रक्कम रु.८,३९,८००/- मा.आयुक्त, कामगार नुकसान भरपाई, रत्नागिरी यांचे न्यायालयात जमा केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती गृहनिर्माण मंडळात झालेला गैरव्यवहार

**(४९) ७२७५८ (१६-०१-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती गृहनिर्माण मंडळात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी चौकशी आदेश दिलेले असतांना संबंधित विभागाकडून मात्र चौकशीसाठी विलंब करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण मुंबई, मुख्य दक्षता व सुरक्षा विभागाने त्यांच्या विभागाचे मंत्रालयीन अवर सचिव यांना पत्र क्र. मुडवसुअ/ प्रा./२०१५/कक्ष-१/ ८५६ दिनांक २० जुलै, २०१५ नुसार विलंबाबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहार प्रकरणी शासनाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (३१-०३-२०१७) :** (१) व (२) मौजे बडनेरा, धारणी व वणी येथील जमिनीवर बाह्य विद्युतीकरणाच्या विकास कामासंदर्भातील प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण स्तरावरुन प्रकरणाची चौकशी करण्यात आली असता सदर कामे ही मंजूर नकाशानुसार नियमाप्रमाणे पूर्ण करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

मात्र, चौकशीमध्ये निविदेची जाहिरात साप्ताहिक पत्रात न दिलेबाबतची त्रुटी आढळून आली. परंतु, सदर योजनाच्या कामांच्या निविदांना मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन झालेली अनियमितता तत्कालिन मुख्य अभियंता-१, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी दि.२१.११.२०११ रोजीच्या पत्रान्वये क्षमापित केलेली आहे.

तसेच सदरच्या कामाची गुणवत्ता समाधानकारक असल्याने ती कामे मे. एल.सी.डी.ई.एस.एम कंपनीकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखली शहरातील (जि.बुलढाणा) येथील जुना गोदरी रस्त्याचे काम दोन वर्षापासून बंद पडले असल्याबाबत

**(५०) ७३१७४ (१६-०१-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली शहरातील (जि.बुलढाणा) प्रभाग ४ मध्ये असलेल्या जुना गोदरी रस्त्यांचे काम गत दोन वर्षापासून बंद पडले असून याबाबत वारंवार तक्रारी व मागणी करुनही नगरपालिका याकडे हेतूपुरस्सरपणे दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम त्वरीत मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७) :** (१) जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्या अहवालानुसार हे खरे नाही.
(२) सन २०१५-१६ करीता चिखली नगरपरिषदेस रु.५०.०० लक्ष सर्वसाधारण रस्ता अनुदान मंजूर व वितरीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.